अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.४५/२०२४
जा.क्र उआ(मा.प्र.)/ आस्था/१४९८ दि. १० /५/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(मा.प्र.)/अपिल/४५/२०२४

श्री.आर्यन ज्ञानेश्वर कंधारे
म.नं.८७/६, त्रिमुर्ती कॉलनी
सुतार दवाखान्याच्या पाठीमागे
कंधारे बिल्डींग, ४ था मजला
आझाद नगर, कोथरुड, पुणे-४११०३८

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.आर्यन ज्ञानेश्वर कंधारे, म.नं.८७/६, त्रिमुर्ती कॉलनी, सुतार दवाखान्याच्या पाठीमागे, कंधारे बिल्डींग, आझाद नगर, कोथरुड, पुणे-४११०३८ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.८/२/२०२४ (आ.क्र.१९४७९, दि.१३/२/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. मूळ अर्ज महापालिका आयुक्त कार्यालयाने जा.क्र.स्वागत/१२६१४ दि.१२/२/२०२४ रोजी सामान्य प्रशासन विभाग व बांधकाम विभागाकडे वर्ग केला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/१२५५९, दि.२२/२/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ८/२/२०२४ | १३/२/२०२४ | १२/३/२०२४ | २२/२/२०२४ | ० |

माहिती अधिकार अर्जातील झोन क्र.३ ते ५ यांनी वेळेत माहिती दिली नाही. बांधकाम १ व २ यांनी खोटी, दिशाभूल करणारी बोगस व बनावट माहिती दि.७/३/२०२४ व दि.५/३/२०२४ च्या पत्राने दिले आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी असे नमूद करुन दि.२०/३/२०२४ रोजी (आ.क्र.२२५४३ दि.१६/३/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे. मूळ अपिल अर्ज महापालिका आयुक्त कार्यालयाने जा.क्र.२१९६९, दि.२२/३/२०२४ रोजी बांधकाम व सामान्य प्रशासन विभागास वर्ग केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २०/३/२०२४ | २६/३/२०२४ | ११/४/२०२४ | होय | -- |

सदर अपिलाची सुनावणी दि.२५/४/२०२४ रोजी स.११.४५ वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/१६११, दि.१९/४/२०४ रोजी कळविण्यात आले होते. मात्र, सदर सुनावणी अपिलार्थी उपस्थित राहिले नसल्याने दि.०३/०५/२०२४ रोजी दुपारी ४.०० वा. आयोजित करणेबाबत जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/९३९, दि.२६/४/२०२४ रोजी कळविण्यात आले होते. प्रशासकीय कारणास्तव सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. श्री.आर्यन कंधारे यांना श्रीमती रेवती थिटे (वरिष्ठ लिपीक-भ्र.नं.९५५२५६२९७१) संपर्क साधला असता दि.०८/०५/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. अपील सुनावणी घेण्याचे कळविले आहे. सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

## विवेचन

माहिती अधिकार अर्जातील झोन क्र.३ ते ५ यांनी वेळेत माहिती दिली नाही. बांधकाम १ व २ यांनी खोटी, दिशाभूल करणारी बोगस व बनावट माहिती दि.७/३/२०२४ व दि.५/३/२०२४ च्या पत्राने दिले आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी असे नमूद करुन दि.२०/३/२०२४ रोजी (आ.क्र.२२५४३ दि.१६/३/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे. मूळ अपिल अर्ज महापालिका आयुक्त कार्यालयाने जा.क्र.२१९६९, दि.२२/३/२०२४ रोजी बांधकाम व सामान्य प्रशासन विभागास वर्ग केला आहे.

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.८/२/२०२४ (आ.क्र.१९४७९, दि.१३/२/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. बांधकाम झोन क्र.१ ते ५ कर्तव्यात कसूर केल्याबद्दल लोकप्रतिनिधी यांच्या अर्जाच्या साक्षांकित प्रति मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/१२५५९, दि.२२/२/२०२४ नुसार माहिती अवलोकनार्थ प्रत्यक्ष राहणेबाबत कळविण्यात आले आहे.

माहितीचे अवलोकनासाठी बोलविले असता अपिलार्थी आले नसल्याचे सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

माहिती अधिकारातील अपिल सुनावण्या जास्त असल्याने व खाते प्रमुख यांचे बदलीमुळे तसेच, सदर सुनावणी प्रथम दि.२५/४/२०२४ तद्नंतर दि.३/५/२०२४ असे दोन वेळा पुढे ढकलण्यात आल्याने सुनावणीस विलंब झाला आहे.

सुनावणी दि.३/५/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. काही प्रशासकीय कारणामुळे सुनावणी रद्द करण्यात आली. सदर दिवशी अपिलार्थी उपस्थित असल्याने माहिती अवलोकनासाठी देण्यात आली. अपिलार्थी यांना अपेक्षित माहिती उपलब्ध नसून सदर माहिती बांधकाम विभागाशी निगडीत असल्याचे अपिलार्थी यांनी नमूद केले.

अपिल अर्जावर सुनावणीसाठी दि.८/५/२०२४ रोजी बोलविण्यात आले असता अपिलास उपस्थित राहणार नसल्याचे व उपलब्ध कागदपत्रांचे आधारे आदेश पारित करण्यास अपिलार्थी यांनी दूरध्वनीद्वारे संमती दिली आहे.

माहिती अधिकारात मूळ माहिती अधिकार अर्जातील माहिती देण्यात आली नसल्याचे निदर्शनास येत आहे. वस्तूस्थिती विचारात घेता सामान्य प्रशासन विभागाकडील उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना विनामूल्य देण्यात यावी असे अपिलाधिकारी यांनी नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी अपिलार्थी यांना माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.४५/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P. Patil
10.5.24

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-

जन माहिती अधिकारी,

आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका